# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः12.07.2025** **वारःशनिवार**

---

1. महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक विधानपरिषदेत आवाजी मतदानानं संमत
2. पशुसंवर्धन व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय
3. शेतरस्त्यांच्या निर्मितीसाठी समिती स्थापन करून योजना कालबद्ध पद्धतीनं राबवणार असल्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
4. रोजगार मेळाव्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे 51 हजारांहून युवकांना नियुक्ती पत्रं प्रदान करणार आणि,
5. भारत इंग्लंड तिसरा कसोटी सामना चुरशीच्या अवस्थेत

**जनसुरक्षा विधेयक**

महाराष्ट्र जन सुरक्षा विधेयक विधानपरिषदेत काल आवाजी मतदानानं संमत करण्यात आलं. विरोधकांनी सभात्याग केल्यानंतर त्यांच्या अनुपस्थितीत या विधेयकाला मान्यता देण्यात आली. विधानसभेत या विधेयकाला या आधीच मंजूरी मिळाली आहे. गृहराज्यमंत्री योगेश नाईक यांनी हे विधेयक विधानपरिषदेत मांडलं. हा कायदा नागरिकांच्या संरक्षणासाठी आणला असल्याचं सांगून यामागची सरकारची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. मात्र विरोधकांनी या विधेयकाला तीव्र विरोध केला. यावेळी झालेल्या गदारोळामुळे विधान परिषदेचं कामकाज 10 मिनिटांसाठी तहकूब करण्यात आलं. कामकाजाला पुन्हा सुरुवात झाल्यानंतर विरोधकांनी सभात्याग केल्यामुळे महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक विरोधकांच्या अनुपस्थितीत आवाजी मतदानानं मंजूर करण्यात आलं.

दरम्यान, महाविकास आघाडीनं जनसुरक्षा विधेयकाला असहमती देणारं पत्र सभापती यांना सादर केलं आहे. विधेयकाची मूळ रचना दडपशाहीची, संदिग्ध आणि दुरुपयोगास पात्र आहे, असं या पत्रात म्हटलं आहे. या विधेयकाला मंजुरी देऊ नका, अशी विनंती राज्यपालांना करणार असल्याचं विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी वार्ताहरांना सांगितलं.

**पशुसंवर्धन**

राज्य मंत्रिमंडळानं पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. असा दर्जा देणारं महाराष्ट्र हे देशातील पहिलं राज्य ठरलं आहे. या निर्णयानुसार पशुधनावर आधारित सर्व व्यवसाय आता कृषी व्यवसायाच्या समकक्ष मानले जातील, अशी घोषणा पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी काल विधीमंडळात केली. या धोरणात्मक सुधारणेमुळे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन आणि वराहपालन व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांना नव्या सवलतींचा लाभ होणार आहे. कृषी व्यवसायास केली जाणारी कर आकारणी, वीज दर आकारणी तसंच कर्जावर व्याजदर आकारणी आता पशुपालकांना केली जाईल. या निर्णयामुळे राज्यातील पशुसंवर्धन क्षेत्रात क्रांती घडेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

**पाणंद**

प्रत्येक शेतकऱ्याच्या शेताला रस्ता देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. शेतमालाची ने-आण करण्यासाठी शेतरस्त्यांच्या निर्मितीला प्राधान्य देण्यात येणार असून ही योजना समग्र असण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना केली. ते म्हणाले......

**मी या सभागृहामध्ये असं जाहीर करतो की याची समग्र योजना तयार करण्याकरता चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी आम्ही तयार करू एक महिन्यामध्ये या समितीने आपला अहवाल त्या ठिकाणी द्यावा लेखाशीर्ष आवश्यक असेल तर डिसेंबरच्या अधिवेशनापर्यंत ते लेखाशीर्ष तयार करण्याचा आपण प्रयत्न करू. कन्व्हरजन्सनी जर योजना पूर्ण होत असेल आणि त्याला कुठल्यातरी याच्यातनं पैसे द्यायचे असतील तर तशाही प्रकारचं जे काही या ठिकाणी आपण ठरवाल. पण या समितीने पुढच्या पाच वर्षामध्ये राज्यातले सगळे पाणंद रस्ते हे त्या ठिकाणी, शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची आवाजाही करता येईल या दृष्टीनं मजबूत करणे याकरता उपाययोजना सुचवावी आणि एका महिन्यात त्याचा अहवाल शासनाला सादर करावा.**

बावनकुळे यांनी याबाबत अधिक माहिती दिली. वाटप पत्रात शेतकऱ्यांचा समावेश करणे, शेतरस्त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी लोक अदालती घेणे, रस्त्यांचे सपाटीकरण करणे, चालू वहिवाट रस्त्यांचे सर्वेक्षण, गाव नकाशात हे रस्ते घेणे याबाबत कार्यवाही करण्यात येईल. शेतरस्ता कमीत कमी 12 फूट रुंदीचा करण्यात येईल. शेत रस्त्यांना दर्जा देणे, त्यांची मालकी आणि देखभाल महसूल विभागाकडे सोपवणे आणि स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करून निधीची तरतूद करणे यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवण्याचं आश्वासन बावनकुळे यांनी दिलं.

**<u>पाणी विषयक</u>**

दुष्काळी भागात पाणी उपलब्ध करून देण्यास शासनाचं प्राधान्य असून मांजरा खोऱ्यात पाणी पुरवठ्याबाबत बैठक आयोजित केली जाईल, असं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी विधानसभेत सांगितलं. सीना-माढा प्रकल्पासाठी या वर्षात 20कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. कुकडी प्रकल्पाच्या कालव्यांची कामं आणि माणिकडोह प्रकल्पाचं कामही प्राधान्यानं केलं जाईल, असंही विखे-पाटील म्हणाले.

**<u>धर्मांतर</u>**

धर्मांतर करत आरक्षणाचा लाभ घेत असलेल्यांवर कारवाई करण्यात येईल, असं मुख्यमंत्र्यांनी काल विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितलं. आरक्षणाचा लाभ ज्या धर्मातील प्रवर्गात घेतला आहे, त्याच धर्मात राहण्याबाबत निकाल सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

**<u>विधान परिषद</u>**

महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा अर्थात CET च्या 27 एप्रिल रोजी झालेल्या परीक्षेच्या प्रश्न पत्रिकेत 21 प्रश्नांमध्ये त्रुटी आढळून आल्याचं उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मान्य केलं. याला जबाबदार समितीची सेवा खंडित करण्यात आली असून आता विभागाकडून, सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुनील भिरुड यांच्या अध्यक्षतेखाली 7 सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<u>रोजगार मेळावा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नव्यानं नियुक्त झालेल्या 51 हजारांहून अधिक युवकांना नियुक्ती पत्रं वितरित करणार आहेत. पुण्यातल्या रोजगार मेळाव्यात नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते नियुक्तीपत्रं देण्यात येतील. देशभरात आतापर्यंत झालेल्या रोजगार मेळ्यांद्वारे 10 लाखांहून अधिक नियुक्ती पत्रं जारी करण्यात आली आहेत.

**<u>शिवकालीन-किल्ले</u>**

संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना अर्थात युनेस्कोने महाराष्ट्रातील 11 आणि तामिळनाडूतील जिंजी अशा एकंदर 12 शिवकालीन किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला आहे. याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाने भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाकडे सादर केला होता. यामध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि जिंजी यांचा समावेश होता. हा अतिशय ऐतिहासिक आणि अभिमानास्पद आणि गौरवपूर्ण क्षण असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**बेदाणे-पवार**

चीनमधून कर चुकवून निकृष्ट बेदाण्यांची मोठ्या प्रमाणावर आयात होत असून ही आयात तात्काळ थांबवावी. तसंच हंगामात बेदाण्यांचे दर स्थिर ठेवून द्राक्षउत्पादक शेतकऱ्यांचं आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीनं कराव्यात, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्र लिहून केंद्र सरकारकडे केली आहे. पवार यांनी या संदर्भात केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याणमंत्री शिवराजसिंह चौहान आणि केंद्रीय व्यापारमंत्री पियुष गोयल यांना पत्र लिहिलं आहे.

**एआय-ऊस-धाराशीव**

धाराशिव जिल्ह्यात ऊस उत्पादनात क्रांती घडवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातर्फे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. जिल्ह्यात उसाचं क्षेत्र 55 हजार हेक्टरहून अधिक असून, या तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं उत्पादन वाढवणे, खर्च कमी करणे, पाणी बचत आणि उत्पन्न वाढवणे या उद्दिष्टांवर लक्ष्य केंद्रित करण्यात आलं आहे. या प्रकल्पासाठी 25 हजार रुपये प्रति हेक्टर खर्च अपेक्षित असून यामध्ये शेतकऱ्याचा वाटा नऊ हजार रुपये असेल. पहिल्या टप्प्यात एक लाख शेतकऱ्यांना याचा लाभ मिळेल.

**ॲप-आधारित**

बसेस, कार, बाईक टॅक्सी यांनी ॲपवर आधारित व्यवसाय करताना नियमांचं उल्लघंन केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. या संदर्भात विधानभवनात झालेल्या बैठकीत सरनाईक बोलत होते. ॲपवर आधारित परिवहन सेवांना केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचं पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**ॲथलेटिक्स**

भारतीय ॲथलेटिक्स संघटनेच्या मान्यतेनं आजपासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात राष्ट्रीय खुल्या ॲथलेटिक्स स्पर्धा सुरू होत आहेत. स्पर्धेत 22 राज्यांसह विविध केंद्रीय संस्थांचे संघ सहभागी होत आहेत. या स्पर्धेत राज्यातल्या 95 खेळाडूंसह देशभरातून साडेतीनशे खेळाडू सहभागी होत आहेत.

**कसोटी-क्रिकेट**

भारत-इंग्लडदरम्यान अँडरसन-तेंडूलकर कसोटी क्रिकेट स्पर्धेत तिसरा सामना काल चुरशीच्या अवस्थेत पाहोचला आहे. लंडनमधील लॉर्ड्स मैदानावर यजमान इंग्लंडविरुद्ध दुसऱ्या दिवशी भारताने 3 बाद 145 धावा केल्या आहेत. इंग्लंड पहिल्या डावात 387 धावांवर सर्वबाद झाल्यानंतर भारत सध्या 242 धावांनी पिछाडीवर आहे. जसप्रीत बुमराहने पाच गडी बाद केले आणि विक्रमाची नेंद केली. भारताचा पहिला डाव सुरु करताना कर्णधार शुभमन गिल 16 धावांवर बाद झाला. के एल राहुल आणि उपकर्णधार रिषभ पंत तिसऱ्या दिवसाचा खेळ आज पुढे सुरु ठेवतील. पाच सामन्यांची कसोटी मालिका सध्या 1-1 अशी बरोबरीत आहे.

**पाऊस-रस्तेबंद**

आंबेनळी घाटात दरड कोसळल्यानं महाबळेश्वर पोलादपूर मार्ग 14 जुलैपर्यंत वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. गडचिरोली जिल्ह्यात पाऊस कमी झाला असला तरी आठ मार्गांवरील वाहतूक ठप्प आहे.

**हवामान**

राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाच्या जोरदार सरी पडतील. कोकणात किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहतील, असा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.